# नाती

''गेल्या जन्मीचे आपले वैरी या जन्मी सर्वात जवळचे नातेवाईक होऊन जन्माला येतात. कारण त्यांच्याइतका आपला छळ कोणीच करू शकत नाही.'' माझी आई त्राग्याने हे कोणाला तरी सांगत असल्याचे मला आठवते. मित्र आपल्याला निवडता येतात, पण नातेवाईक हे जवळजवळ सगळे आपल्यावर लादले गेलेलेच असतात. जन्माचा जोडीदार एकदा निवडल्यावर सासरची सर्व माणसं आपले नातेवाईक होऊन जातात. मित्र आपल्याला हवे तसे वागले नाहीत तर मैत्री तुटते, पण नातेवाइकांमध्ये अगदी खुनापर्यंत प्रकार घडले तरी नाते तसेच राहते.

माणसाला समाजातच जगायचे असते. आपला स्वार्थ आणि इतरांचा स्वार्थ यात सतत संघर्ष चालू असतो. ज्यांच्यासाठी स्वतःच्या स्वार्थाला मुरड घालायची असते तो आपला परिवार, पण ही जाणीव ठेवली गेली नाही, तर परिवारातलेच लोक एकमेकांचे वैरी होऊन बसतात. मैत्री जशी टिकवावी लागते, तशी नातीसुद्धा टिकवावी लागतात.

भाऊ-बहीण, पिता-कन्या, माता-पुत्र ही सर्व नाती मानवाने निर्मिलेली आहेत. निसर्गात ती तशी नाहीत, कारण त्यांच्यामध्ये संबंध घडल्यास संतती निर्माण होऊ शकते. पण पिढ्यानपिढ्या घडलेल्या संस्कारांमुळे ही नाती किती मधुर झाली आहेत. निरपेक्ष प्रेम, परस्परांना आधार, एकमेकांच्या समृद्धीमध्ये सुख अशा अनेक वांच्छनीय भावना या मधुर संबंधातून जोपासल्या जाऊ शकतात. समाजाच्याच नव्हे; तर आपल्याही भल्यासाठी त्याची फार गरज आहे.

आपल्या जवळच्या माणसांपासून दोष लपून राहू शकत नाहीत. दोषांवरच अवधान राहिले, तर गुणांकडे दुर्लक्ष होते. साहजिकच संबंध बिघडतात. इतरांकडून चांगले वागण्याची अपेक्षा ठेवताना आपणही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. गेल्या जन्मीचे वैरी जसे जवळचे नातेवाईक होतात, तसेच आपल्या भल्याची इच्छा करणारेसुद्धा होत असावेत. कारण तीही संधी नातेवाइकांनाच जास्त असते, पण आपण संबंध टिकविले, तरच हेही शक्य होणार आहे. टाळी वाजवायला दोन हात लागतात, त्यातला एक हात आपला आणि एक दुसऱ्याचा असला, तर जास्त मजा आहे. कारण एकमेकांचे पटत असल्याची ती पावती आहे.

पटतंय का तुम्हाला ? मग द्याच टाळी !

---

– भीष्मराज बाम

('मना सज्जना' या पुस्तकातून)